Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA**
PHONE : Director Office –( 0231)2609068 CAP Section –
(0231)2609317/2609110 Website – www.unishivaji.ac.in, Email – cap@unishivaji.ac.in

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६००४, महाराष्ट्र**
दुरध्वनी : संचालक कार्यालय-०२३१ २६०९०६८ मध्यवर्ती मूल्यमापन विभाग-०२३१ २६०९३१७/२६०९११०
संकेतस्थळ – www.unishivaji.ac.in, ई-मेल आयडी - cap@unishivaji.ac.in

**Ref. No. SU/Exam/CAP/** 1090 **Date :** 15 OCT 2025

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून (ऑक्टों./नोंव्हें. २०२५ या हिवाळी सत्र परीक्षेपासून) पुढील ०३ शैक्षणिक वर्षांकरीता पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमांच्या भाग – १ परीक्षा (प्रथम वर्ष) आयोजन व उत्तरपत्रिका मूल्यमापन कामकाज महाविद्यालयीन स्तरावर करणेबाबत व या अनुषंगाने कार्यपध्दतीबाबत.**

**संदर्भ : १) या कार्यालयाचे जा.क्र./एसयु/एक्झाम/कॅप/७८५ दि.१९/०४/२०२५ रोजीचे पत्र**
**२) या कार्यालयाचे जा.क्र./एसयु/एक्झाम/कॅप/९५९ दि.२३/०६/२०२५ रोजीचे पत्र व त्यासोबत पाठविलेली कार्यपध्दती.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयास अनुसरून पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमांचे भाग – १ परीक्षेचे (प्रथम वर्ष) परीक्षा आयोजन व उत्तरपत्रिका मूल्यमापन कामकाज फक्त मार्च/एप्रिल, २०२५ या उन्हाळी सत्राकरीता महाविद्यालयीन स्तरावर करणेबाबत कळविण्यात आले होते. या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपध्दती उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये आपणांस कळविण्यात आली आहे.

तथापि, विद्यापीठ अधिकार मंडळांनी आता पुनःश्च घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून (ऑक्टों./नोंव्हें. २०२५ या हिवाळी सत्र परीक्षेपासून) पुढील ०३ शैक्षणिक वर्षांकरीता पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमांचे भाग – १ परीक्षांचे (प्रथम वर्ष) आयोजन व उत्तरपत्रिका मूल्यमापन कामकाज महाविद्यालयीन स्तरावर करणेस मान्यता दिली आहे. तसेच या अनुषंगाने यापूर्वी तयार करण्यात आलेली उपरोक्त संदर्भीय क्र. २ अन्वये कळविण्यात आलेली कार्यपध्दती पुढील ०३ शैक्षणिक वर्षांकरीता लागू करण्यास मान्यता दिली आहे.

-२-

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून (ऑक्टों./नोंव्हें. २०२५ या हिवाळी सत्र परीक्षेपासून) पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमांच्या (बी.ए., बी. कॉम., बी.एस्सी. (सर्व अभ्यासक्रम), बी.बी.ए., बी.सी.ए., बी.सी.एस., बी.ए.बी.एड्., बी. व्होक (सर्व विद्याशाखा)) भाग - १ परीक्षेचे वेळापत्रक व प्रश्नपत्रिका नियोजन विद्यापीठ स्तरावर करण्यात येणार असून सदर प्रथम वर्ष परीक्षेचे आयोजन व उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन महाविद्यालयीन स्तरावर करण्यात यावे. या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबतची कार्यपध्दती पुनःश्च सोबत आपणांस पाठविण्यात येत असून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

तसेच विद्यापीठ अधिकार मंडळांनी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार सदर प्रती सत्र महाविद्यालयीन स्तरावर होणा-या मूल्यमापन कामकाजाची आवश्यकतेनुसार पडताळणी समितीमार्फत पडताळणी करण्यात येणार आहे. तेंव्हा ज्या-ज्या वेळी पडताळणी समिती महाविद्यालयास पडताळणी करण्यासाठी भेट देईल त्या-त्या वेळी समितीस आवश्यक सर्व कागदपत्रे उपलब्ध करून देवून सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत :- वरीलप्रमाणे कार्यपध्दती.

प्रत :-

1. मा. कुलगुरू कार्यालय
2. मा. प्र-कुलगुरू कार्यालय
3. मा. कुलसचिव कार्यालय
4. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ कार्यालय
5. मा. वित्त व लेखाधिकारी कार्यालय
6. परीक्षा विभागातील सर्व प्रशासकीय अधिकारी व सर्व परीक्षा विभाग
7. आय.टी. सेल विभागास
8. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
9. विद्यार्थी सुविधा केंद्र
10. इंटरनेट विभागास सदरचे पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी